# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव
## आरोग्य विभाग
फोन नं. (02554) 231800-01 फॅक्स: (02554) 230894 E-mail: mlghealth@gmail.com, mlgmmc@gmail.com


जा.क्र./मामनपा /आरोग्य विभाग / 436 /२५-२६ दिनांक 04 /07 /2025

**दाखला**

प्रती,

व्यवस्थापक/मुख्याध्यापक
विद्याविकास इंटरन्याशनल स्कूल,
२४८, नीळगव्हाणकाष्टी रोड, भायगाव
ता. मालेगाव जि. नाशिक.

विषय:-आरोग्यदृष्ट्या जागेचा नाहरकत दाखल्या बाबत...

संदर्भ:-VVIS/Out/2025-26/758 Dt.:-24/06/2025

वरील संदर्भीय विषयास अनुसरून २४८, नीळगव्हाणकाष्टी रोड, भायगाव मालेगाव जि. नाशिक या जागेवर स्व.अण्णासाहेब तथा सुधीर बाबुराव पेठकर शिक्षण प्रसारक संस्था संचलित विद्याविकास इंटरन्याशनल स्कूल असून सदर शाळेची जागा आरोग्यदृष्टया योग्य असल्याबाबत दाखला खालील अटी-शर्तीचे अधीन राहुन देण्यात येत आहे.

१.शाळेच्या जागेत व आवारात नियमित साफ-सफाई ठेवण्यात यावी.

२.शाळेच्या जागेत खाद्यपदार्थ इ. वस्तू, साहित्य, साधन, सामग्री यापासून मुतारी / शौचालय / गटार लांब असावी. मुतारी / शौचालय यांची नयमित दैनंदिन स्वच्छता ठेवावी.

३.शाळेच्या जागेत होणारा केर-कचरा साठवण्यासाठी झाकणासह बंदीस्त डबा (डस्टबीन) ठेवणेत यावे. साठवलेला केर-कचरा मनपाच्या घंटागाडीतच टाकावा.

४. शाळेच्या जागेच्या आतील व आजुबाजुचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा.

५. शाळेच्या जागेत पिण्याच्या पाण्याची भांडी नियमितपणे साफ व स्वच्छ ठेवावीत व घट्ट झाकणाने झाकुन ठेवावीत.

६. शाळेच्या जागेच्या व आजुबाजुच्या परिसरात अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. शाळेच्या जागेत नियमित प्रथमोपचार पेटी ठेवण्यात यावी.

८. शाळेच्या आवश्यक त्या ठिकाणी इमारतीच्या आतील व बाहेरील बाजूस सि.सि.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात यावे.

शाळेच्या इमारतीची जागा आरोग्यदृष्ट्या योग्य आहे.आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आपण प्रतिज्ञापत्रांतील लिहून दिलेल्या बाबींची त्वरित पूर्तता करण्याची व त्याचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. सदर दिलेला दाखला व त्यातील अटी-शर्तीमध्ये अलहिदा बदल, सुधारणा व नवीन अट समाविष्ट करणेचा व कोणतेही कारण न देता दाखला रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे. सदरचा दाखला आपले प्राप्त विनंती अर्जावरुन देण्यात येत आहे.

सदर दाखला ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध आहे.

आरोग्य अधिकारी,

आरोग्याधिकारी

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

महानगरपालिका, मालेगाव

स्थापना १७ डिसेंबर २००१